**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २२ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

- **नागपूर हिंसेत झालेल्या नुकसानाची भरपाई दंगेखोऱ्यांकडून केली जाईल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपुरात घोषणा.**
- **नागपूरच्या हिंसाग्रस्त भागात कॉँग्रेस समितीचा दौरा नागपूर पोलिसांनी नाकारला, पोलिस दबावाखाली काम करत असल्याचा कॉँग्रेस नेते विजय वड्डेटीवार यांचा आरोप.**
- **नवसखी सरस महोत्सवाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपुरात उद्‌घाटन.**
- **जागतिक जल दिन विविध उपक्रमांनी साजरा, भंडाऱ्यात काढण्यात आली जागृती रॅली.**

**आता सविस्तर बातम्या** .......

मुख्यमंत्री पत्रकार परिषद

नागपूर मध्ये सोमवारी 17 मार्चच्या रात्री धार्मिक प्रतिके जाळल्यावरून उसळलेल्या हिंसाचाराच्या घटनेमध्ये ज्या लोकांच्या संपत्तीचे नुकसान झाले आहे त्या संपत्तीची नुकसान भरपाई या घटनेला कारणीभूत असलेल्या दंगेखोऱ्यांकडून केली जाईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर येथे केली. नागपूर हिंसाचाराच्या संदर्भात पोलीस आयुक्तालय नागपूर येथे आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

***आता जो काही आपण काही निर्बंध घातले आहेत त्या निर्बंधांमुळे थोडं जनजीवनावर परिणाम होतोय व्यापारावरही परिणाम होतो ते लवकरात लवकर त्यात शिथिलता आणावी अशा प्रकारचा प्रयत्न आहे. आत्ता जे काही नुकसान झाले आहे हे सगळे नुकसान दंगेखोरांकडून वसूल करण्यात येईल. त्याची सगळी किंमत काढली जाईल आणि ते दंगेखोरांकडून वसूल केला जाईल आणि दंगेखोर आणि ते पैसे भरले नाहीत तर त्यांची प्रॉपर्टी विकली जाईल.***

सदर नुकसान भरपाई येत्या 3 ते 4 दिवसात देण्यात येईल. तसेच सध्या लागू असलेल्या संचारबंदीचे निर्बंधात शिथीलता देण्याचा आमचा प्रयत्न आहे असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.या पत्रकार परिषदेपूर्वी त्यांनी पोलीस अधिकारी तसेच नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत आढावा बैठक घेतली होती. पत्रकार परिषदेत त्यांनी या हिंसाचार प्रकरणात 104 लोकांची ओळख पटली आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे, यामध्ये 92 वयस्क असुन 12 विधी संघर्षित बालक असल्याची माहिती दिली. दरम्यान, गुढीपाडव्याच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी माधव नेत्रालय नागपूरच्या कार्यक्रमाला येणार आहेत या पार्श्वभूमीवर त्यांनी या दौऱ्याला कुठलीच अडचण येणार नाही असे स्पष्ट केलं.

***नागपूर शांत आहे काही अडचण नाही आहे नागपुरात आणि जी घटना झाली. ती घटना एका भागात झालेली आहे, 60-70-80 टक्के नागपुरात काही घडले नाही. लोकांचं जनजीवन पूर्ण सुरक्षित आहे. त्यामुळे तो दौरा नीट होणार.***

दरम्यान, नागपूर इथं घडलेल्या हिंसाचारात जखमी झालेल्या चाळीस वर्षीय इरफान अन्सारी नामक व्यक्तीचा आज नागपूरच्या इंदिरा गांधी मेडिकल रुग्णालयात मृत्यू झाला. हिंसाचारादरम्यान अन्सारी यांना मोठ्या प्रमाणात दुखापत झाली होती आणि त्यांच्यावर आयसीयू मध्ये उपचार सुरू होते.

विजय वड्डेटीवार

काँग्रेस पक्षातर्फे आज नागपूरच्या हिंसाग्रस्त भागांमध्ये भेट देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या एका समितीला पोलिसांनी परवानगी नाकारली. ही परवानगी नाकारण्याचं काहीही कारण नसून शांततेचं आवाहन करण्यासाठी आणि परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ही समिती जाणार होती असं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वड्डेटीवार यांनी आज नागपूरात माध्यमांना सांगितले. यावेळी त्यांनी पोलीस दबावाखाली काम करत असल्याच्या शक्यतेबद्दलही प्रश्न उपस्थित केला-

***कुठलाही पक्ष ज्यावेळस अशा प्रकारच्या घटना घडतात त्याची कारणमीमांसा आणि त्याच्या मागे त्या परिसरात जाऊन शांततेचे आवाहन करण्यासाठी आजची समिती होती. याचा अर्थ असा पोलिसांना दबाव असावा***

***आम्ही त्यांच्या चौकशीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करणार नाही. त्याच्या तपासाच्या दृष्टीने आम्हाला आता सध्या काय बोलायचे नाही जोपर्यंत तपास पूर्ण होत नाही.***

माणिकराव ठाकरे-नागपूर वार्ताहर परिषद

देशाच्या मध्यभागी असलेलं नागपूर हे शांततेचं प्रतीक आहे, इथं कधीही दंगली झाल्या नाहीत. हिंदू-मुस्लिम समाजाचं अतूट प्रेमाचं नातं या शहरात आहे. हे नातं तोडण्याचे प्रयत्न यशस्वी होऊ देता कामा नये, असं आवाहन काँग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे यांनी आज नागपूर इथं केलं. काँग्रेस सत्यशोधन समितीनं नागपूर हिंसाचार प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाला असा मोर्चा काढण्याची परवानगी का दिली आणि त्या मोर्चात झालेल्या आक्षेपार्ह कृती पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून थांबवल्या का नाहीत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.
महावितरण पुरस्कार

महावितरणला नुकतंच नवी दिल्ली इथं केंद्रीय सिंचन आणि ऊर्जा मंडळातर्फे सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी वीज वितरण कंपनी म्हणून गौरविण्यात आलं. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते.महावितरणच्या गौरवाबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे आभार मानले तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

नवसखी सरस महोत्सव
नागपूर जिल्हा परिषदेच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून दक्षिण मध्य सांकृतिक केंद्र येथे आयोजित जिल्हास्तरीय नवसखी सरस महोत्सवाचे उद्‌घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी यावेळी उपस्थित होते. नवसखी

सरस महोत्सवात एकूण शंभर स्टॉल्स लावण्यात आले आहेत. या स्टॉल्सची पाहणी करीत मुख्यमंत्र्यांनी स्टॉलधारक महिलांशी संवाद साधला. २६ मार्चपर्यंत सकाळी दहा ते रात्री दहा या वेळेत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान सुधरावे आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे शासनाचे धोरण यशस्वी करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. त्यासाठी विविध प्रदर्शनाच्या माध्यमातून महिलांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. या संकल्पनेतूनच हे आयोजन करण्यात आले आहे.

पायाभूत सुविधा

राज्यात पायाभूत सुविधांचं काम विलक्षण वेगानं सुरु असून 'हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल, फेज-१' या महत्वाकांक्षी प्रकल्पामुळे राज्याच्या पायाभूत सुविधांना लक्षणीय गती मिळाली आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या आढावा बैठकीत बोलत होते.पायाभूत सुविधांसाठी राज्यात ४१ हजार ७३० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून या प्रकल्पाअंतर्गत सुमारे सहा हजार किलोमीटर रस्त्यांची कामं सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं. आत्तापर्यंत २५ हजार ८७५ कोटी रुपयांची तरतूद झाली असून अनेक बँकांच्या आर्थिक सहकार्यामुळे मजबूत आणि संपर्कक्षेत्र विस्तारलेल्या राज्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

येत्या काळात शेती आणि जलसंवर्धन क्षेत्रात नवीन दृष्टिकोन बाळगणे गरजेचे आहे. यासाठी पुढील शतकाचा वेध घेऊन आज कार्य करणे गरजेचे आहे. प्रत्येकाने भविष्याचा वेध घेऊन उद्दिष्टपूर्ती करावी, त्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने, गडकरी यांना शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी खासदार अनिल बोंडे, बळवंत वानखेडे, आदी उपस्थित होते.

जागतिक जल दिवस

आज जागतिक जल दिवस आहे. आजचा दिवस पाण्याच्या जिवंत स्रोतांचं महत्व अधोरेखित करून त्याच्या शाश्वत व्यवस्थापनाचा पुरस्कार करतो. जगभरातल्या

जलसंकटाचा सामना करण्यासाठी जागरूकता निर्माण करून, कृतीला प्रेरणा देणं हे याचं उद्दिष्ट आहे. जागतिक जल दिवस हा २०३० सालापर्यंत सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छता सुनिश्चित करण्याच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी जोडला आहे. 'हिमनद्यांचं संवर्धन', ही यंदाच्या जल दिनाची संकल्पना आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक जल दिनानिमित्त पाण्याचं संवर्धन आणि शाश्वत विकासाला चालना देण्याच्या देशाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे. पाणी ही मानवी संस्कृतीची जीवनरेखा असून, भविष्यातल्या पिढ्यांसाठी त्याचं संरक्षण करण्याची गरज असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. जलसंकट हा जागतिक चिंतेचा विषय बनला असला, तरी भारताने या आव्हानाचं संधीत रूपांतर केलं आहे, असं केंद्रीय जलसंपदा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जागतिक जल दिना निमित्त समाज माध्यमावर म्हटलं आहे. वाढत्या औद्योगिक कारणामुळे सर्व नैसर्गिक स्रोतांचा अतिवापर आणि शोषणामुळे मानवाला पाण्याचा तीव्र टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे आज जागतिक जल दिनानिमित्त भंडारा जिल्ह्यातील समर्थ विद्यालयातील विदयार्थनी लाखनी शहरातून रॅली काढत हातात बॅनर घेऊन नारे देत 'पाणी अडवा पाणी जिरवा 'असा नारा देत लोकांना संदेश दिला आहे.

हवामान

विदर्भाच्या गोंदिया, भंडारा आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये आज वादळी पर्जन्यवृष्टीचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून या ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या पर्जन्यवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. उर्वरित विदर्भात मात्र हवामान कोरडं राहणार असल्याचा अंदाज आहे.

******